प्रेसनोट दि.१३/११/२०१७

## महाराष्ट्र लोहमार्ग पोलीस ३३ वी परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा

महाराष्ट्र लोहमार्ग पोलीस ३३ वी परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा दि. ६.११.२०१७ ते दि. ११.११.२०१७ पर्यंत पुणे रेल्वे पोलीस मुख्यालय येथे संपन्न झाली, सदर परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेत मुंबई लोहमार्ग पोलीस दल, नागपुर लोहमार्ग पोलीस दल व पुणे लोहमार्ग पोलीस दल सहभागी झाले होते. क्रिडा स्पर्धेत अॅथल्टीक्स,व्हॉलबॉल,थ्रो बॉल. रनींग, रिले स्वीमींग. हॉकी, फुटबॉल इ खेळ खेळले गेले पुणे लोहमार्ग मधुन १ आधिकारी ६८ पुरूष १९ महिला , मुंबई लोहमार्ग जिहयामधुन १ आधिकारी ९५ पुरूष ३० महिला. नागपुर लोहमार्ग जिल्हयामधुन १ आधिकारी ५३ पुरूष १६ महिला कर्मचारी असे एकुण ३ आधिकारी २८१ कर्मचारी यांनी भाग घेतलेला आहे

लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०१७ चा सांगता सोहळा, पारितोषिक वितरण समारंभ दि. ११.११.२०१७ रोजी १६.३० वाजता **मा. श्री.जय जीत सिंह,अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट राज्य मुंबई** यांच्या शुभहस्ते पुणे लोहमार्ग जिल्हा, पोलीस कवायत मैदान खडकी पुणे येथे संपन्न झाला त्यांनी सदर कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणुन महाराष्ट्र लोहमार्ग पोलीस दलातील सर्व खेळाडु यांचे अभिनंदन करून त्यांनी आपआपल्या खेळात जास्तीज जास्त नैपुण्य दाखवुन खात्याची व वर्दीची शान उंच ठेवावी, असे गौरवपर भाषण करून स्पर्धकांना प्रेरणा दिली.त्यांचे हस्ते विविध खेळात विशेष नैपुण्य मिळविण्या–या सर्व खेळाडुंना बक्षिस वितरण केले. या स्पर्धेचे सर्व साधारण विजेतेपद (जनरल चॅम्पीयनशिप) लोहमार्ग मुंबई या संधाने मिळविला, व **सर्वौत्कष्ट पुरूष खेळाडु पो शिपाई संभाजी हाटकर व सर्वोत्कष्ट महिला खेळाडु म्हंणुन उज्वला तळेकर** दोन्ही मुबई रेल्वे यानी बहुमान पटकाविला. या कार्यक्रमास श्री अमोघ गावकर (भापोसे) पोलीस आधिक्षक, लोहमार्ग नागपुर, श्री प्रभाकर बुधवंत पोलीस आधिक्षक लोहमार्ग पुणे (भापोसे) अपर पोलीस उप आधिक्षक श्री तुषार पाटील,प्रभारी पोलीस उप अधिक्षक (होम) तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार बंधु आणी सर्व पोलीस आधिकारी व कर्मचारी क्रिडा शौकीन हजर होते. अपर पोलीस अधिक्षक तुषार पाटील यांनी कार्यक्रमाचे शेवटी आभार प्रदर्शन केले व सुत्रसंचालन पो हवा यांदव यांनी केले.

या कार्यक्रमात १.क्रिडा प्रमुख रापोनि सुरेश गवई, टिम मॅनेजर, सपोउपनिरी प्रकाश सपकाळ **पुणे** २. क्रिडा प्रमुख रापोनि रमेश निकम, टिम मॅनेजर, सिद्राम मंगानुर **मुंबई** ३. क्रिडा प्रमुख रापोउपनि राजेद्र सरोदे टिम मॅनेजर, सपोउपनिरी किशोर सरक **नागपुर** तसेच परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा प्रमुख म्हणुन **अजय लोंखडे मुंबई यांनी** काम पाहिले